# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

वाचले:- १) अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडील पत्र जा.क्र.पोअ/जिविशा/टे-१३/१४९७/२०२१, दि.२७/०४/२०२१
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३)
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.२९/०४/२०२१

क्र/गृह/का.१/टे.४/मनाई आदेश/एस.आर.१९/२०२१
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर
दिनांक:०५/०५/२०२१.

अपर जिल्हा दंडाधिकारी पालघर जिल्हा पालघर

ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक १ वर अंतर्भूत असलेल्या पत्रान्वये अपर पोलीस अधीक्षक पालघर यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, मराठा समाजास शिक्षण व नोकरीत देण्यात आलेल्या आरक्षणास मा.सर्वोच्च न्यायालय यांनी स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील मराठा आरक्षण कृती समिती, मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज तसेच विविध हिंदुत्ववादी संघटना व राजकीय पक्ष यांचेकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात येत आहेत.

सदर मराठा समाजास लागू करण्यात आलेले आरक्षण तात्काळ मिळावे या मागणीकरीता राज्यभरात विविध मराठा संघटनांकडून ठिकठिकाणी बैठका आयोजित केल्या जात असून मराठा समाजात लवकरात लवकर आरक्षण मिळावे, या करीता जिल्हयातील खासदार, आमदार, मंत्री यांचे निवासस्थान/कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन अशा विविध प्रकारची आंदोलने करण्यात आली आहेत. भविष्यात आरक्षण बाबत लवकरात लवकर निर्णय झाला नाहीतर वरील संघटनांकडून अचानकपणे रास्ता रोको करणे, धरणे धरणे, मंत्री महोदय यांचे दौरा दरम्यान निवेदने देणे, घेराव घालणे, घोषणाबाजी करणे अशा प्रकारची आंदोलने करण्याची भविष्यात शक्यता नाकारता येत नाही व त्यावरुन आंदोलने होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाने संसदेत १) कृषी उत्पन्न, व्यापार आणि वाणिज्य २) कृषी मुल्य आश्वासन, ३) कृषी सेवा करार अशी ०३ विधेयके मंजूर केलेली आहेत. सदर विधेयकास देशभरातील तसेच राज्यातील शेतकरी/शेतकरी संघटना/ राजकीय पक्ष यांचेकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे. विधेयके मंजूर झाल्याने विविध स्वरुपाची उग्र आंदोलने होऊन भारत बंद सुध्दा पुकारण्यात आलेला होता. वरील तिन्ही विधेयकाबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण केल्यामुळे भविष्यात वरील ०३ ही विधेयके रद्द व्हावीत या मागणीकरीता शेतकरी व शेतकऱ्यांना पाठींबा देणाऱ्या विविध संघटना व राजकीय पक्षाकडून अद्यापी आंदोलने चालू आहेत.

वाढवण, ता.डहाणू येथील नियोजित "वाढवण बंदर "या प्रकल्पास वाढवण परीसरातील ग्रामस्थ, वाढवण विरोधी संघर्ष समिती, विविध राजकीय पक्ष व स्थानिक पातळीवरील विविध संघटनांनी रॅली काढून व निदर्शने करुन नियोजित वाढवण बंदर प्रकल्प रद्द करावा या मागणी करीता मोठया प्रमाणात विरोध दर्शविलेला आहे. तसेच भविष्यात वाढवण बंदर अनुषंगाने कोणतेही काम करावयाचे ठरविल्यास (सर्व्हे, जमीन मोजणी, माहिती गोळा करणे)

ग्रामस्थांकडून, संघटनांकडून व राजकीय पक्षांकडून मोठया प्रमाणात विरोध करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जावू शकतो.

तसेच रिलायन्स कंपनीकडून पालघर जिल्हयात गॅस वाहून नेण्याकरीता पाईप लाईनचे काम करण्यात आलेले आहे. सदर कंपनीकडून अद्यापही काही प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांवर अन्याय झाला असलेबाबत वेळोवेळी बैलगाडी, मोर्चा, उपोषण, धरणे, आंदोलने इत्यादी आंदोलने करण्यात आलेली आहेत. परंतू आपणास अद्यापही रिलायन्स कंपनीकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याने काही प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कार्यकारी अभियंता एम.एम.आर.डी.ए.यांचे मार्फत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत मौजे वैती, ता.डहाणू येथे प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्राचे कामकाज सुरू आहे. सदर प्रकल्पास स्थानिक लोकांचा व आजूबाजूचे गावातील काही ग्रामस्थांचा विरोध आहे.

दि.१३/०५/२०२१ रोजी शिवजयंती (परंपरेनुसार), दि.१४/०५/२०२१ रोजी अक्षय्य तृतीया, रमजान ईद या सणाच्या अनुषंगाने नागरीक मोठ्या प्रमाणात एकत्र येवून सदरचा सण साजरा करीत असतात, पालघर जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील आहे. या सणाच्या दरम्यान शुल्लक कारणावरून विघातक कृत्य करणारे समाज कंटक, जातीय गुंड याचा फायदा घेवून समाजात तेढ निर्माण करून अशांतता निर्माण करणे अशी कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सामान्य जनजीवन सुरळीत व शांततामय स्वरुपात राहावे, सार्वजनिक शांतता अबाधीत राहावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता प्रतिबंधात्मक आदेश लागू करावेत त्याच प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (३) अन्वये पोलीस अधीक्षक पालघर यांचे पूर्व परवानगीशिवाय पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास, सभा घेण्यास किंवा मिरवणूका काढण्यास बंदी घालण्यात यावी या करीता वरील घटनांच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पालघर जिल्हयात (वसई तालुका वगळून) हद्दीत दि.१०/०५/२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दि.२३/०५/२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व कलम ३७ चे पोटकलम (३) चे स्वतंत्र आदेश लागू करणेस विनंती आहे, असे कळविले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नमुद परिस्थितीनुसार पालघर जिल्हयातील पोलीस अधीक्षक पालघर यांचे कार्यकक्षेत सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी **डॉ.किरण महाजन, अपर जिल्हादंडाधिकारी पालघर** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून पालघर जिल्हयातील पोलीस अधीक्षक पालघर यांचे कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक १०/०५/२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २३/०५/२०२१ रोजीचे २४.०० वा.** या कालावधीमध्ये खालील बाबीसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल,

अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे.

२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

३) दगड किंवा क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

४) व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृती किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

५) जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे.

६) ज्यामुळे सभ्यता अगर नीतिमत्ता यांस धक्का पोहोचेलअशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे, हावभाव करणे अगरसोंग आणणे, आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा त्यांचा जनतेत प्रसार करणे.

वरील कलम ३७ (१) अंतर्गतचा हा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरीष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्त्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागु असणार नाही.

त्याच प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस अधीक्षक पालघर यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेण्यांस किंवा मिरवणुका काढण्यास या आदेशान्वये बंदी घालीत आहे. हा आदेश लग्नकार्यासाठी जमलेले लोक, प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणूका यांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज **दिनांक ०५/०५/२०२१** रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-XXX**
(डॉ.किरण महाजन)
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:**-सर्व संबधित.
**प्रत:**-मा.अपर मुख्य सचिव,गृह विभाग (विशेष),महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत:**-मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत:**-पोलीस अधीक्षक, पालघर यांना माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
**प्रत:**-उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी.
**प्रत:**-कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/जव्हार/मोखाडा/विक्रमगड/वाडा यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
**प्रत:**-जिल्हा माहिती अधिकारी, पालघर यांचेकडे वृत्तपत्रात बातमी म्हणून प्रसिध्दीसाठी रवाना.

(डॉ.किरण महाजन)
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**